क्रमांक: पोअय/जन संपर्क अधिकारी / प्रेस नोट/2025
कार्यालय पोलीस अधीक्षक यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: 445 001
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 02/10/2025

# प्रेस नोट

## विशेष मोहिमे अंतर्गत यवतमाळ पोलीस दलातर्फे एकुण १४ गुन्हयातील ५३७.७७९ किलो ग्रॅम (गांजा) अंमली पदार्थ करण्यात आला नाश.

---

मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्रानुसार एन.डी.पी.एस कायद्यान्वये दाखल गुन्हयातील अंमली पदार्थ नाश करणे करीता विशेष मोहिम राबविणेबाबत आदेशीत केले होते. यवतमाळ जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल गुन्हयातील जप्त (गांजा) अंमली पदार्थ नाश बाबतचे एकुण 14 गुन्हयांमध्ये मा. न्यायालयाचे अंतिम आदेश झाले होते. त्याअनुषंगाने सर्व कायदेशिर प्रक्रिया पार पाडुन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांची परवांगीने दिनांक 01/10/2025 रोजी M/s Maharashtra Enviro power Limited, Plot No CHW-01 MIDC Butibori, District Nagpur येथे 14 गुन्ह्यातील एकुण एकत्रीत वजन 537.779 किलो ग्राम (गांजा) अंमली पदार्थ DRUG DIPOSAL COMMITTEE यांचेकडुन पंचासमक्ष नाश/ भस्मीकरण करण्यात आला आहे.

दरवर्षी 26 जुन हा दिवस जागतीक अंमली पदार्थ विरोधी दिन म्हणुन पाळला जातो. नशेमध्ये अडकलेल्या एखादयाच्या शारिरीक आणि माणसिक आरोग्यावर कसे दुष्परिणाम होतात व एखादया व्यक्तीचे संपुर्ण आयुष्य कसे बिघडु शकते, अशा नशेत आहारी गेलेल्या लोकांचे जिवन वाचवणे, प्रत्येक व्यक्ती, मुले, मुली यांच्या मध्ये जागरुकता करणे हा या दिवाचा मुळ उद्देश आहे.

सदरची कारवाई ही DRUG DIPOSAL COMMITTEE चे अध्यक्ष मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ श्री. कुमार चिंता, सदस्य अपर पोलीस अधीक्षक श्री. अशोक थोरात, सदस्य प्र. पोलीस उपअधीक्षक श्री. सुनिल हुड यांचे मार्गदर्शनात पो.नि. श्री. सतिश चवरे, स्था.गु.शा. यवतमाळ, वाचक स.पो.नि.श्री. मनिष गावंडे व अंमली पदार्थ विरोधी कक्षातील अंमलदार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

( शुभांगी गुल्हाणे )
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय,यवतमाळ

Scanned with OKEN Scanner